**टोकियो, जपान येथे सन २०२० मध्ये होणा-या ऑलिम्पिक स्पर्धेमध्ये जास्तीत जास्त पदके प्राप्त करण्याच्या दृष्टीने कृती आराखडा तयार करण्यासाठी कार्यकारी समितीची स्थापना.**

**महाराष्ट्र शासन**

**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः केआरए-२०१५/प्र.क्र.२०७/क्रीयुसे-१**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
तारीख: १६ ऑक्टोबर, २०१५

वाचा -

**आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांचे क्र.शिक्रीपी/२०२०/२०१५-१६/का-११/४९६, दिनांक १७ ऑगस्ट, २०१५ चे पत्र.**

प्रस्तावना -

महाराष्ट्र राज्याला क्रीडा संस्कृतीचा मोठा वारसा असून क्रीडा धोरण राबविणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. तसेच क्रीडा विषयक पायाभूत सुविधा निर्माण व विकसीत करण्यासाठी महाराष्ट्र राज्य अग्रेसर आहे. खेळाडूंच्या क्रीडा विषयक कामगिरीमुळे राज्याच्या व देशाच्या नावलौकीकात भर पडत आहे. तथापि, प्रतिभावान खेळाडू घडविण्यासाठी खेळांच्या पायाभूत सुविधा, क्रीडा मार्गदर्शकांचे मार्गदर्शन, सराव व प्रशिक्षणासाठी पुरेसे साहित्य, प्रशिक्षणाचा कृती आराखडा, खेळातील कौशल्यांवर प्रभुत्व येण्यासाठी सराव नियमित प्रशिक्षण, स्पर्धा, खेळाडूंच्या सकारात्मक मानसिकतेसाठी मानसोपचार तज्ज्ञाचे मार्गदर्शन, आहार तज्ज्ञ, मसाजिस्ट, दुखापतीवर इलाजासाठी फिजिओथेरेपिस्ट इत्यादी बाबींचे मार्गदर्शन खेळाडूंना पुरविणे आवश्यक आहे. वरील सर्व बाबींचा समन्वय राखून राज्यातील उदयोन्मुख खेळाडूंद्वारे टोकियो, जपान येथे सन २०२० मध्ये होणा-या ऑलिम्पिक स्पर्धेमध्ये जास्तीत जास्त पदके प्राप्त करण्याच्यादृष्टीने कृती आराखडा तयार करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय-

सन २०२० मध्ये टोकीयो (जपान) येथे होणा-या ऑलिम्पिक स्पर्धेत राज्यातील खेळाडूंनी किमान २० पदके मिळविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्या दृष्टीने कृती आराखडा तयार करुन त्याबाबतची अंमलबजावणी करण्याकरिता खालीलप्रमाणे कार्यकारी समितीची स्थापना करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

### कार्यकारी समितीची रचना

| | | |
|---|---|---|
| १ | सहसंचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे | अध्यक्ष |
| २ | उपसंचालक (मुख्यालय), क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य |
| ३ | श्री.बाळासाहेब लांडगे ( सचिव, महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन) | सदस्य |
| ४ | श्री.नामदेव शिरगांवकर (सदस्य, भारतीय ऑलिम्पिक संघटना व सचिव, मॉडर्न पेंटॅथलॉन फेडरेशन ऑफ इंडीया) | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ५ | श्रीमती अंजली भागवत (राजीवगांधी खेलरत्न पुरस्कार्थी व अर्जुन पुरस्कार्थी) | सदस्य |
| ६ | श्री.निखील कानिटकर (माजी ऑलिम्पियन) | सदस्य |
| ७ | श्री.प्रल्हाद सावंत (वरीष्ठ उपाध्यक्ष, भारतीय ॲथलेटीक्स संघटना) | सदस्य |
| ८ | श्री.काका पवार, ऑलिम्पियन अर्जुन पुरस्कार्थी - कुस्ती | सदस्य |
| ९ | श्री.गोपाळ देवांग, ऑलिम्पियन अर्जुन पुरस्कार्थी-बॉक्सींग | सदस्य |
| १० | उपसंचालक (शिवछत्रपती क्रीडापीठ, बालेवाडी), क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य सचिव |

उपरोक्त समितीचे अध्यक्ष आवश्यकतेनुसार विविध खेळातील तज्ञ / खेळाडू / मान्यवर व्यक्ती यांना निमंत्रीत करु शकतील.

**समितीची कार्यकक्षा :-**

१. सन २०२० मध्ये टोकीयो (जपान) येथे होणा-या ऑलिम्पिक स्पर्धेत राज्यातील खेळाडूंनी किमान २० पदके मिळविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्या दृष्टीने खालील बाबी विचारात घेऊन कृती आराखडा तयार करणे.

२. २०२० ऑलम्पिकसाठी महाराष्ट्रातील मान्य खेळातील संभाव्य प्रतिभासंपन्न खेळाडूंच्या निवडीसाठी पात्रता व निकष निश्चित करुन,खेळाडूंची निवडीस अंतिम स्वरुप देणे इत्यादी संदर्भातील कृती आराखडा तयार करणे.

३. २०२० ऑलम्पिकसाठी निश्चित करण्यात आलेल्या खेळाडूंच्या प्रशिक्षण सुविधा, प्रशिक्षण ठिकाण, प्रशिक्षण टप्पानिहाय निश्चित करणे (Training Stages) व आवश्यकतेनुसार बदल करणे.

४. मान्य खेळातील तज्ञांची, क्रीडा मार्गदर्शकांची समिती गठित करणे व त्यांच्याकडून करावयाच्या कामाची रुपरेषा ठरवून अमंलबजावणी प्रक्रियेवर नियंत्रण ठेवणे.

५. प्राविण्यप्राप्त खेळाडू घडविण्याच्या प्रक्रियेसाठी आवश्यक असलेल्या क्रीडा वैदयकशास्त्र (Sports Medicine), भौतिक उपचारशास्त्र (Physiotherapist), क्रीडा मानसशास्त्र (Sports Psychologist), आहारशास्त्र (Sports Nutritionist) इत्यादी विविध तज्ञांचे सहकार्य घेण्याबाबत निर्णय घेऊन आवश्यक अमंलबजावणी करणे.

६. २०२० ऑलम्पिकसाठी मान्य खेळांचे खेळनिहाय वार्षिक, पंचवार्षिक व खेळाडूच्या दर्जानिहाय अंदाजपत्रक संबंधितांकडून मागवून समितीच्या मान्यतेने शासनास सादर करणे.

७. उपरोक्त संदर्भात कार्यालयीन कामकाजासाठी स्वतंत्र कक्ष स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करणे.

**समितीचा कालावधी:-**

सन २०२० ऑलिम्पिक खेळांचे प्रत्यक्ष आयोजन होईपर्यंत उपरोक्त समिती कार्यरत राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५१०१६१७२९०३८३२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Sudhir Narhar Joshi

Digitally signed by Sudhir Narhar Joshi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=ae398dc3198690b46b6cf9b227ff99cbbfa40f24b5beeb33a668bc465f937400, cn=Sudhir Narhar Joshi
Date: 2015.10.16 17:32:07 +05'30'

**( सु. न. जोशी )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव.
२. प्रधान सचिव (शा.शि.व क्री.वि.) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
३. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा,महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. महालेखापाल, लेखा व अनुज्ञयेता, महाराष्ट्र - १/२, मुंबई / नागपूर.
५. महालेखापाल, लेखापरिक्षा, महाराष्ट्र - १/२, मुंबई / नागपूर.
६. सर्व जिल्हाधिकारी (संचालनालयामार्फत)
७. सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी (संचालनालयामार्फत)
८. सर्व उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा (संचालनालयामार्फत)
९. श्री.बाळासाहेब लांडगे, सचिव, महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन (संचालनालयामार्फत पत्राद्वारे)
१०.श्री.नामदेव शिरगांवकर, सदस्य, भारतीय ऑलिम्पिक संघटना व सचिव, मॉडर्न पेंटॅथलॉन फेडरेशन ऑफ इंडीया (संचालनालयामार्फत पत्राद्वारे)
११.श्रीमती अंजली भागवत, राजीव गांधी खेलरत्न पुरस्कार्थी व अर्जुन पुरस्कार्थी (संचालनालयामार्फत पत्राद्वारे)
१२.श्री.निखील कानिटकर, माजी ऑलिम्पियन (संचालनालयामार्फत पत्राद्वारे)
१३.श्री.प्रल्हाद सावंत, वरीष्ठ उपाध्यक्ष, भारतीय ॲथलेटीक्स संघटना (संचालनालयामार्फत पत्राद्वारे)
१४.श्री.काका पवार, ऑलिम्पियन अर्जुन पुरस्कार्थी-कुस्ती (संचालनालयामार्फत पत्राद्वारे)
१५.श्री.गोपाळ देवांग, ऑलिम्पियन अर्जुन पुरस्कार्थी-बॉक्सींग (संचालनालयामार्फत पत्राद्वारे)
१६.मा.मंत्री (शा.शि.व क्रीडा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१७.नियोजन विभाग, कार्यासन-१४८१, मंत्रालय, मुंबई.
१८. वित्त विभाग, व्यय-५, मंत्रालय, मुंबई.
१९.अर्थसंकल्प शाखा, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२०.अवर सचिव, (क्रीयुसे - २, क्रीयुसे -३)
२१.निवडनस्ती, क्रीयुसे-१.